# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ ग्रामिण -२ / ५८३ /२०१६/ १४**

**( नोदंणी क्रमांक २०१६०६००२७ )**

तक्रार दाखल दिनांक :- ०८.०६.२०१६
निकाल दिनांक :- ०२.०८.२०१६

श्री. साहेबराव शिवराम गांवडे,
गट नंबर १६६, दहेगांव ता. गंगापुर , तक्रारदार
औरंगाबाद ४३१ ००१.
( ग्राहक क्रमांक ५०६६३०००५७८८ )

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .ग्रामिण मंडळ - २ ,औरंगाबाद गैरअर्जदार

**उपस्थिती**

| | | |
|---|---|---|
| मंच सदस्य | १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| | २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| | ३ ) श्री. वि. सु काबरा | सदस्य |

अपिलार्थी - श्री. साहेबराव शिवराम गांवडे,ता.गंगापुर, जि.औरंगाबाद.

गैरअर्जदार - श्री. आर,एम काळे, कार्यकारी अभियंता, ग्रामिण विभाग २, औरंगाबाद

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री साहेबराव शिवराम गांवडे, गट नंबर १६६, दहेगांव बंगला ( हॉटेल गणेश ) औरंगाबाद ( ग्राहक क्रमांक ५०६६३०००५७८८ ) यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ,नोडल ऑफीसर, ग्रामिण विभाग - २ महावितरण औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग ( ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ अन्वये सूची अ मध्ये तक्रार दिनांक ०८.०६.२०१६ रोजी दाखल केली आहे तक्रारीचा तपशिल थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

अर्जदारास अंतर्गत ग्राहक गा-हाणे निवारण कक्षाने दिलेला निकाल मान्य नाही. फेब्रुवारी २०१६ मध्ये देण्यात आलेले विज देयक मान्य नसल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत नमूद केले. सदर विज देयक दुरुस्त करुन दयावे अशी विनंती ग्राहकाने केली आहे. ग्राहकाने अंतर्गत गा-हाणे कक्षाने दिलेल्या निकालाची प्रत जोडली आहे. सदर निकालामध्ये नमूद केले की गंगापुर उपविभागाने सादर केलेल्या बिल रिव्हीजन रिपोर्ट दिनांक १४.०३.२०१६ मध्ये रिव्हीजन आय डी क्रमांक १३१७४४१ ऑनलाईन संगणक प्रणाली मध्ये नाकारण्यात आली असून ग्राहकास स्लॅब बेनिफीट देण्यात आलेला नाही. ग्राहकाच्या सिपीएल वरुन मिटर बदली केल्यापासुन म्हणजेच ऑगस्ट २०१४ ते फेब्रुवारी २०१६ या दरम्यान ९०५५ युनिटची विभागणी करुन ग्राहकास विज बिल दुरुस्त करुन देण्यात यावे करीता ग्राहकाची तक्रार निकाली काढण्यात येत आहे .

**<u>कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण विभाग - २ ,महावितरण, औरंगाबाद यांचे म्हणणे</u>**

गैरअर्जदार कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) ग्रामिण विभाग - २ औरंगाबाद यांचे दिनांक २६.०७.२०१६ नुसार , उप-कार्यकारी अभियंता भरारी पथक, औरंगाबाद ( ग्रामिण ) यांनी सदरील ग्राहकाने एकूण ९९३५ युनिटची विज चोरी केलेली आहे तरी त्याप्रमाणे विज बिल आकारणी करण्यात यावे असे कळविले .या अनुषंगाने उपविभाग, गंगापुर कार्यालयाने ग्राहकास विज चोरी आकारणी ( विदयुत कायदा २००३ चे कलम १३५ अन्वये ) रुपये १५७३५९.९७ विज चोरीचे बिल दिलेले आहे . त्यामुळे सदरील ग्राहकाचे अपील रदद करण्यात यावे .

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष</u>**

अर्जदार व गैरअर्जदार यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेल्या म्हणण्यानुसार ग्राहकाने विज चोरी केलेली आहे. सदर प्रकरणावरुन विदयुत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण ग्राहक गा-हाणे निवारण मंचाच्या कक्षेत येत नाही . त्यामुळे मंच खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

पान क्रमांक ३ /-

# आदेश

१ ) ग्राहकाची तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२ ) महावितरणने ग्राहकावर नियमानुसार कार्यवाही करावी.

३ ) ३० दिवसाचे आत आदेशावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |